महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १०२७/२०२२**

**अपिलार्थी, श्री. राष्ट्रपाल केशव गोंडाणे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत चिकना, पो. डोंगरमौदा, ता. कुही, जि. नागपूर-४४१२१०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती कुही, ता. कुही जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०६.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.१२.२०२१ | २४.१२.२०२१ | ०६.०१.२०२२ | २८.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०१.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "जानेवारी २०१९ पासून नोव्हेंबर २०२१ पर्यंत झालेल्या गट ग्रामपंचायत चिकणाच्या सर्व सभांची माहिती खालील बिंदुमध्ये द्यावी. १) गटग्रामपंचायत चिकणा च्या सर्व मासिक सभांची माहिती व ठरावांच्या प्रमाणित प्रती. २) सर्व आमसभा, ग्रामसभा तसेच विशेष ग्रामसभा यांची माहिती व ठरावांच्या प्रमाणित प्रती. ३) ग्रामपंचायत मध्ये कार्यरत असणाऱ्या पदाधिकारी आणि कर्मचारी यांचा तपशिल व कार्यकालाची माहिती द्यावी ४) प्रत्येक सभेसाठी झालेल्या खर्चाच्या नोंदी व बिलांच्या प्रमाणित प्रती द्याव्यात. ५) श्री. बांते ग्रामसेवक तसेच श्री. लिंगायत ग्रामसेवक यांचा तपशिल व कार्यकाळाची माहिती द्यावी. ६) १६ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेची उपस्थिती प्रत आणि सभेच्या फोटो द्याव्यात " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपण मुद्दा क्र. १ व २ मध्ये मासिक सभ, ग्रामसभा, विशेष ग्रामसभांच्या ठरावाच्या प्रमाणित प्रती मागितलेल्या आहेत. सदर माहिती विस्तृत स्वरुपाची असून लिगल पेजच्या झेरॉक्स काढण्यासाठी मासिक व ग्रासभांचा अभिलेख मांढळ येथे घेऊन जावा लागतो. रेकॉर्ड मुख्यालयातून हलविणे अभिलेखाच्या दृष्टीने सुरक्षिततेचे नाही. त्यामुळे आपण मागितलेल्या माहितीचे अवलोकन करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय चिकना येथे दि. ३०.१२.२०२१ ला दुपारी १२.०० वा. उपस्थित रहावे. दु. १२.०० ते १.०० हया कालावधीत रेकॉर्डचे अवलोकन करावे. सोबत फक्त पेन्सील व कोरा कागद

घेऊन यावे, पेन व मोबाईल सोबत आणता येणार नाही. मुद्दा क्र. ४ ची माहिती उपलब्ध नाही. मुद्दा क्र. ६ नुसार दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ च्या विशेष ग्रामसभा उपस्थितीची प्रत आपणास देण्यात येत आहे. (आकार लहान असल्याने) मुद्दा क्र. ३ व ५ हा स्वतंत्र विषय असल्याने त्यासाठी स्वतंत्र अर्ज करावा, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०६.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत चिकणा यांनी अर्जाशी संबंधित असलेली माहिती अपिलकर्ता यांना सत्यप्रती नियमानुसार १० दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५.०२.२०२२ रोजी १) जानेवारी २०१९ ते नोव्हेंबर २०२१ पर्यंतच्या मासिक सभा व ग्रामसभांच्या प्रोसेडींग बुकांच्या प्रमाणित प्रती व २) मुद्दा क्र. ३ व ५ ची प्रपत्रात माहिती अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यात आलेली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १२.०४.२०२२ रोजी** "अपुर्ण माहिती मिळाली" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १२.०४.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी हे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्रीमती समता पाटील व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री. पल्हाद मुंढे हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. गोंडाणे यांनी दिनांक ०१.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र-अ नुसार जानेवारी २०१९ पासून नोव्हेंबर २०२१ पर्यंत झालेल्या गट ग्रामपंचायत चिकणाच्या सर्व सभांची माहिती मागितलेली असून त्यात एकूण ६ मुद्यांची माहिती मागितलेली आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत दिनांक २४.१२.२०२१ रोजी सविस्तर प्रतिसाद दिलेला आहे. त्यावर अपिलार्थी यांनी विहीत मुदतीत माहिती प्रदान न केल्याचा आक्षेप नोंदवित प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्याअनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत चिकणा यांनी अर्जाशी संबंधित असलेली माहिती अपिलकर्ता यांना सत्यप्रती नियमानुसार १० दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेशित केले. त्यावर अपिलार्थी यांनी प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज दाखल केला असून त्यात १) मिळालेली माहिती अपुर्ण व ओबडधोबड स्वरुपात मिळाली. २) प्रथम अपील नंतर माहितीच्या प्रतीचे पैसे घेण्यात आले व प्रतिंची संख्या वाढवून आर्थिक खर्च वाढविला. ३) माहितीच्या प्रत्येक पानावर पेज क्र. टाकलेला नाही तसेच बरेच पाने साक्षांकित केलेले नाही. ४) जवळजवळ ४०० रिकाम्या पानांच्या प्रती देऊन अतिरिक्त खर्च बसविला, असे नमूद केले आहे.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२१ रोजीच्या पत्रात अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेवून दिनांक ३०.१२.२०२१ रोजी माहितीचे अवलोकन करण्याविषयी प्रतिसाद दिलेला आहे. मात्र १ तासाच्या कालावधीत संपुर्ण माहितीचे अवलोकन करणे शक्य नसल्याचा अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०१.२०२२ रोजी अर्ज दिलेला असल्याचे आढळून येते. प्रस्तूत प्रकरणी प्रदान करण्यात आलेली माहिती साक्षांकित केलेली नसल्याचा अपिलार्थी यांचा आक्षेप लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचेशी संपर्क व समन्वय साधून यापूर्वी प्रदान करण्यात आलेल्या माहितीच्या प्रत्येक पृष्ठांवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत पुरविण्यात येत असलेली माहिती या शिक्क्यासह व माहितीचा अधिकार कायद्याच्या लोगोसह अपिलार्थीस माहिती पुनश्च: प्रदान करण्यात यावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २४.०६.२०२४**

जावक क्रमांक ६६२९ दिनांक 05 SEP 2024